महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2022 ◐ BW 139441

प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई
प.मु.वि.क्र. ८०००२४
14 FEB 2023
सक्षम अधिकारी

श्रीमती एल. एस. सांगळे

//करारनामा//

हा करार दि.२२/०२/२०२३ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय येथे तयार करण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे उत्तरदायित्व असलेले मा. उपायुक्त (माहिती व तंत्रज्ञान), श्री. संजय शिंदे, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे ४०१ १०१ येथे महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम,१९४८ अन्वये नोंदणीकृत कार्यालय (कार्यालयीन व्यवहाराच्या सुलभीकरण करण्यासाठी यापुढे "महानगरपालिका" असा उल्लेख केला जाईल.) मनपाचे असलेली उत्तराधिकारी म्हणून नेमणूक केलेल्या व्यक्ती आणि हे पहिल्या भागातील करारनामा लिहून घेणारे प्रथम पक्षिय.

For RAMDEV ENTERPRISES

Proprietor

जोडपत्र-१ Annexure - I

फक्त प्रतिज्ञापत्रासाठी Only for Afidavit

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव _____ RAMDEV ENTERPRISES

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे रहिवाशी पत्ता _____ Shreenath Bhavan, Shop #3, 37/43 Bora Bazar Street, Fort, Mumbai-400 001.

मुद्रांक विक्रियागतची नोंद वही अनु. क्रमांक 765 दिनांक _____

(1)

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही परवानाधारक मुद्रांक विक्रित्याची सही

परवाना क्रमांक : ८०००००२४ डी. डी. पाटणकर

मुद्रांक विक्रीचे ठिकाण/पत्ता : दि बॉम्बे मेट्रोपोलिटीन मेजिस्ट्रेटस कोर्टस् बार असोसिएशन एस्प्लेनेड कोर्ट, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१

17 FEB 2023

17 FEB 2023

शासकीय कार्यालयासमोर/न्यायालयासमोर प्रतिज्ञापत्र सादर करणेसाठी मुद्रांक कागदाची आवश्यकता नाही. (शासन आदेश दि. ०१/०७/२००४) नुसार

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांना त्याच कारणासाठी मुद्रांक खरे केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

मे. रामदेव इंटरप्रायजेस., श्रीनाथ भवन शॉप -३ ३७/४३, बोरा बझार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई -४००००१. येथे नोंदणीकृत कार्यालय असणारे (कार्यालयीन व्यवहाराच्या सुलभीकरण करण्यासाठी ठेकेदार असा उल्लेख केला जाईल.) सदर कंपनीचे सर्व प्रकारचे व्यवस्थापकीय संचालक किंवा कोणतेही अधिकृत प्रतिनिधी किंवा नेमून दिलेल्या व्यक्ती हे दुस-या भागातील करारनामा लिहून देणारे द्वितीय पक्ष.

ज्याअर्थी मिरा भाईदर महानगरपालिकेतील विविध विभागाकरीता निविदेतील स्पेसिफीकेशन प्रमाणे आवश्यक टोनर पुरवठा करणे आवश्यक आहे,

त्याअर्थी मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मा. उपायुक्त (माहिती व तंत्रज्ञान) यांनी टोनर व कारट्रेज पुरवठा करणेकामी दि. २३/१२/२०२२ रोजी निविदा मागविण्याकरीता जाहिर सुचना महानगरपालिकेचे ई.टेडरींग वेबसाईट https://mahatenders.gov.in. प्रसिध्द करण्यांत आली होती.

ज्याअर्थी द्वितीय पक्षीय यांनी सदरचे काम करणेबाबत दि.०८/१२/२०२२ रोजी प्रस्ताव सादर केलेला आहे, सदरचा प्रस्ताव **ANNEXURE "A"** म्हणून संबोधण्यात येत आहे

त्याअर्थी प्रथम पक्षीय यांनी दिलेल्या प्रस्तावाच्या आणि कामाच्या तपशिलचा विचार करून द्वितीय पक्षीय यांनी सदर कामाकरीता दिलेल्या दि.०९/०२/२०२३ रोजीच्या वाटाघाटीनंतरचे दर कमी असल्यामुळे दि.१४/०२/२०२३ रोजी मा. आयुक्त साो. यांनी सदर प्रस्तावास दिलेल्या मंजुरी अन्वये व प्रकरण क्र.262, ठराव क्र.261 अन्वये प्रशासकीय सभा दि.17/02/2023 रोजीच्या मंजूरीने द्वितीय पक्षीय यांना खालील अटीशर्तीस अधिन राहून टोनर पुरवठा करणे कामासाठी नेमण्यासाठी ठरविले आहे, आणि त्यास अनुसरून खालील अटी शर्तीनुसार करारनामा करण्यांत येत आहे. त्याच प्रमाणे सदर कराराचा अटी व शर्ती उभयपक्षीय यांना बंधनकारक आहेत. या कराराच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१. मे. रामदेव इंटरप्रायजेस (द्वितीय पक्षीय) हे प्रथम पक्षीय यांना उत्कृष्ट दर्जाचे टोनर वेळेवर पुरवठा करतील. द्वितीय पक्ष यांना मनपाच्या संगणक विभागाने मागणी केल्यापासून दोन दिवसात टोनर पुरवठा करणे बंधनकारक आहे. सदर टोनरमध्ये जर काही फरक असेल तर त्यास द्वितीय पक्ष जबाबदार असून सदर टोनर विनामुल्य व त्वरीत बदलून देणे बंधनकारक राहील.
२. द्वितीय पक्षीय यांनी सदर पुरवठा (टोनर) संगणक विभाग प्रमुख यांनी तपासल्या नंतरच करावा.
३. द्वितीय पक्षीय यांनी मुदतीत पुरवठा न केल्यास किंवा पुरवठा अपूर्ण किंवा मालाचा दर्जा बाबत तक्रार आल्यास, द्वितीय पक्षीय यांच्या कडुन एकूण कंत्राट रक्कमेच्या 0.1% या दराने दंड आकारण्यात येईल. तसेच विलंबामुळे पुरवठासाठी मालाचा दर्जामुळे महानगरपालिकेस होणा-या नुकसानीस द्वितीय पक्ष जबाबदार राहतील.
४. सदर कामासाठी द्वितीय पक्षीय यांनी महानगरपालिकेस सुरक्षा अनामत रक्कम देण्याचे मान्य केले आहे. सदरची सुरक्षा अनामत रक्कम द्वितीय पक्षीय यांना दयावयाच्या देयकाच्या 5% दराने बॅक गॅरंटी च्या स्वरूपात प्रथम पक्षीय यांच्याकडे जमा करण्याचे द्वितीय पक्षीय यांनी मान्य केले आहे, सदरची सुरक्षा अनामत रक्कम ही पुरवठा झाल्यावर 5 वर्षानंतर द्वितीय पक्षीय यांच्या मागणीनुसार परतावा करण्यात येईल. बॅक गॅरंटी जमा न केल्यास व्दितीय पक्षीय यांच्या देयकातुन सदरची रक्कम कपात करणेत येईल.

६. या करारामुळे कुठल्याही स्वरुपाची मिरा भाईंदर महानगरपालिकेस शर्ती झाल्यास द्वितीय पक्ष शतीपूर्तीची हमी देत आहे.

७. द्वितीय पक्षीय यांनी त्यांना दिलेले काम करण्यास खंडीत केले किंवा करारनाम्यातील अटीशर्तीचा भंग केल्यास द्वितीय पक्षीय यांच्या सोबत केलेला करारनामा रद्द करुन द्वितीय पक्षीय यांनी जमा केलेले सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्याचे अधिकार प्रथम पक्षीय यांस राहील.

८. करारनामा प्रमाणे द्वितीय पक्षीय कामकाजाबाबत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास प्रथम पक्षिय जो निर्णय देईल तो द्वितीय पक्षियांना बंधनकारक राहील.

९. कोणत्याही कारणास्तव करारनाम्यातील नमुद करण्यात आलेल्या मंजुर दरापेक्षा द्वितीय पक्षीय जास्त दराची मागणी करणार नाही.

१०. द्वितीय पक्षीय कार्यादेशात नमुद केलेल्या माल पुरवठा केल्यानंतरच द्वितीय पक्षीयाने देयक सादर करावयाचे आहे.

११. या करारनाम्यातील नियमांचे पालन द्वितीय पक्षाने न केल्यास प्रथम पक्षीय यांना, द्वितीय पक्षीय यांस नोटीस बजावण्याचा तसेच कायदेशीर कारवाई करण्याचा अधिकार राहील.

१२. पुरवठा केलेल्या मालाचा दर्जा वारंवार निकृष्ट आढळून आल्यास, द्वितीय पक्षीय यांना सदर मालाचे देयक देण्यात येणार नाही.

१३. पुरवठा केलेला माल खराब निघाल्यास किंवा मध्येच खराब झाल्यास सदर माल विनामुल्य बदलून दयायची जबाबदारी द्वितीय पक्षाची यांची राहील.

१४. वरील सदर करारनामा द्वितीय पक्षीय व त्यांचे बाबी वारसदारांना बंधनकारक राहील. सदरचा करारनामा द्वितीय पक्षीय यांनी राजी खुशीने व अक्कल हुशारीने समजून उमजून भरून दिलेला आहे.

१५. निविदेतील दर सर्व करासह (GST सह) आहेत. सर्व प्रकारचे शासकीय कर भरण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१६. आयकर व इतर लागू कर पूरवठादाराच्या देयकातून कपात करणेत येतील.

१७. निविदेतील दर स्पेअर पार्टसह आहेत.

१८. पूरवठादाराने 125 New HP 1213 Pro Multifunction Printer Or higher model (Scan, Copy, Print, ADF), 125 HP226DW Multifunction Printer Or higher model (Scan, Copy, Print, ADF), 100 New HP 1020 + Only Printer Or higher model, 50 New Epson L310 Multifunction Printer (Scan, Copy, Print, ADF), 5 New Epson L805 Multifunction Printer (Scan, Copy, Print, ADF), 5 New HP 9050 Printer पूरवठा करावे लागतील.

१९. महानगरपालिकेच्या आवश्यकतेनुसार वाढीव प्रिंटर पूरवठा करावे लागतील.

२०. प्रिंटर चांगल्या दर्जाचे असावेत.

२१. एखादा प्रिंटर बंद असेल तर सदर प्रिंटर पुर्णत: बदलून देण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

२२. पूरवठादारास प्रिंटर दुरुस्तीसाठी अनुभवी व पात्र इंजिनिअर विनामुल्य पूरवठा करणे बंधनकारक आहे.

२३. पूरवठादारास महानगरपालिकेचे 50 Mulitifunction printers, Konica Minolta Heavy One Duty Printer, 20 Normal Printer, 4 Colour Photocopy Printer and printers विनामुल्य सर्व स्पेअरपार्टसह दुरुस्त करणे

२७. पूरवठादारास महानगरपालिकेच्या एका कार्यालयातून इतर कार्यालयात/इतर शासकीय कार्यालयात प्रिंटर हस्तांतरण (Shifting/Moving) करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. याकामी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारता येणार नाही.

२८. पूरवठादारास सर्व प्रिंटर 30 दिवसात पूरवठा करणेस बंधनकारक आहे.

२९. सर्व प्रिंटरची देखभाल दुरुस्ती विनामुल्य स्पेअरपार्टसह करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

३०. प्रिंटरच्या देखभाल दुरुस्तीसाठी विनामुल्य इंजिनिअर कार्यालयीन वेळेत व आवश्यकता असल्यास सुट्टीच्या दिवशीही पूरवठा करावा लागेल.

३१. सर्व प्रिंटर कार्यान्वित असल्याबाबत मासिक अहवाल सादर करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

३२. ठेकेदारास काम एका दिवसात पूर्ण करावे लागेल.

३३. ठेकेदाराने पूरवठा केलेले सर्व प्रिंटरचे व महानगरपालिकेचे सर्व प्रिंटर कार्यान्वित ठेवण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

३४. इंजिनिअरने अर्ध्या तासात कोणताही प्रिंटर कार्यान्वित करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

३५. सदर काम स्पेअरपार्टसह आहे. प्रिंटर दुरुस्तीसाठी व कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक स्पेअरपार्ट विनामुल्य उपलब्ध करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

३६. ठेकेदार अटीशर्तीचे पालन करण्यास असमर्थ ठरल्यास करार रद्द करण्यात येईल आणि ठेकेदाराची सुरक्षा अनामत रक्कम/बँक गॅरंटी जप्त करण्यात येईल.

३७. मान्यताप्राप्त संस्थेकडून मालाचे Lab Testing करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

३८. जर निविदादारास काम मंजूर झाल्यानंतर महानगरपालिकेसोबत करार करण्यासाठी 7 दिवसांच्या आत सुरक्षा अनामत जमा केली नसेल आणि कार्यादेश दिल्यानंतर 7 दिवसांच्या आत काम सुरु केले नसेल तर अनामत रक्कम जप्त केली जाईल आणि तसेच निविदादाराला निविदा भरता येणार नाही/ त्याची Digital Signature लॉक करण्यात येईल.

३९. करार संपुष्टात येणे – जर निविदाधारक निर्धारित कालावधीत प्रिंटर व टोनर पूरवठा करण्यास अयशस्वी ठरला असेल तर खालीलपैकी एक किंवा त्यापेक्षा अधिक पर्यायाने नुकसान भरपाई कार्यवाहीस ठेकेदार पात्र ठरेल.

अ) कार्यादेश 2 लाखाच्या आत असल्यास ठेकेदाराकडून नुकसान भरपाई म्हणून 1/2 टक्का प्रति आठवडा दंड पूरवठा न केलेल्या मालावर आकारला जाईल. (जास्तीत जास्त 10% दंड आकारला जाईल. कार्यादेश 2 लाखाच्या वर असल्यास ठेकेदाराकडून नुकसान भरपाई म्हणून 1/2 टक्का प्रति आठवडा पूरवठा न केलेल्या मालावर आकारला जाईल. (जास्तीत जास्त 5% दंड आकारला जाईल)

ब) पूरवठादाराने पूरवठा केलेला माल इतर पूरवठादाराकडून साम्य माल खरेदी करण्याचा अधिकार महानगरपालिकेस राहील. याकामी महानगरपालिकेचे होणारे नुकसान ठेकेदाराच्या देयकातून किंवा सुरक्षा रकमेतून वसुल केले जाईल. अशा परिस्थितीत करार रद्द करण्याची आवश्यकता नाही.

क) करार रद्द करणे – वरीलप्रमाणे 'ब' व 'क' पर्यायातून जास्त दराने माल खरेदी केल्याने महानगरपालिकेचे झालेले किंवा होणारे नुकसान ठेकेदाराच्या सुरक्षा अनामत रकमेतून किंवा देयकातून वसुल केले जाईल.

४०. करारनाम्याची मुदत करारनाम्याच्या तारखेपासून 5 वर्ष राहील. (कराराची मुदत दि.22/02/2023 ते दि.21/02/2028)

सुरक्षा अनामत रक्कम जमा करणेबाबत तसेच सदर कामाचा करारनामा रद्द करण्याचा

मे. रामदेव इंटरप्रायजेस., यांनी सदर करारनामा आमचे समोर लिहून दिला व वाचून सही केलेली आहे. सदर करारनाम्यावर आमचे समक्ष महानगरपालिका सिल वठविण्यात आलेले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकाचे)
(संजय शिंदे))
मा. उपायुक्त (माहिती व तंत्रज्ञान)) सही
(करारनामा लिहून घेणार प्रथम पक्षिय))

मे. रामदेव इंटरप्रायजेस)
डायरेक्टर श्री.) सही
(करारनामा लिहून देणाराद्वितीय पक्षिय))

For RAMDEV ENTERPRISES
Proprietor

१) साक्षीदार - (दिपक खाकि)
२) साक्षीदार -

शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

२) साक्षीदार →

उपायुक्त (मु.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

सन २०२२/२३ / करारनामा रजिस्टर
अनु. क्रं. १५२३ दि. १५/३/२३ अन्वये
नोंद करणेत आली.

महापालिका सचिव
मिरा-भाईंदर महानगरपालिका